केल्यानें होत आहे रे I आधीं केलेंची पाहिजे II

Bhartiya Shikshan Prasarak Sanstha Amabajogai's

# Shri Siddheshwar Mahavidhalaya, Majalgaon

# Dist.Beed. M.S. India.



# Internal Quality Assurance Cell

## Criterion 3: Research,Innovations and Extension

**3.4.3 Number of extension and outreached Programmes conducted by the institution through NSS/ NCC etc., (including the programmes such as Swachh Bharat, AIDS awareness, Gender issues etc. and/or those organised in collaboration with industry, community and NGOs during the last five years**

**2020-21**

IQAC Coordinator

Co-Ordinator
I Q A C
Shri Siddheshwar Mahavidyalaya
Majalgaon Dist. Beed (M.S.)

Principal

Principal
Shri Siddheshwar Mahavidyalaya
Majalgaon,Dist.Beed 431 131

Website:www.ssmm.ac.in

**दत्तोपंत ठेंगडी जन्मशताब्दी वर्ष 2020 21 या वर्षामध्ये शैक्षणिक संकुल म्हणून खालील कार्यक्रम घ्यावेत**

**अ)विद्यार्थ्यांकरिता कार्यक्रम**

१)प्रश्नमंजुषा- जीवन व कार्य

२)वक्तृत्व स्पर्धा

३) चित्रकला स्पर्धा

४)स्वदेशी वस्तू प्रसार

आ)माजी विद्यार्थी -श्रमजीवी विद्यार्थी सर्वेक्षण करून श्रेणी शह: बैठका व दत्तोपंतजी जीवन व कार्य यांची ओळख

इ) शिक्षक -

१)प्रत्येक शिक्षकाने दत्तोपंतजिच्या कार्य या विषासंदर्भात व्याख्यान देणे

२)प्रत्येक शिक्षकाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ वन्य संघटनेमध्ये आपल्या आवडीनुसार स्वतःला जोडून घ्यावे .

३) कार्यशाळा- कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग

४) शिक्षकांच्या गट- पट व्यवस्थेनुसार संस्कार केंद्राच्या 1000 मीटर परिसरातील वंचित समाजातील अशिक्षित विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करणे व त्यांच्यासाठी शिकवण्याची वेगळी व्यवस्था करणे.

५) प्रत्येक संस्कार केंद्राने उपेक्षित समाजातील विद्यार्थी पालक covid-19 मुळे ग्रस्त झालेले आहेत .त्यांचे सर्वेक्षण करून अडचणी जाणून घेऊन त्यावर

Shri.Siddheshwar Mahavidyalaya Majalgaon Dist.Beed-431131(MH)

उपाययोजना करणे

६) श्रद्धेय दत्तोपंत जी जीवन व
कार्य याविषयी विद्यार्थ्यांसाठी
पुस्तिका तयार करावी.

७) प्रत्येक संस्कार केंद्राच्या
ग्रंथालयात श्रद्धेय दत्तोपंत
चे ग्रंथांची खरेदी करणे व
पुस्तक परिचय करून देणे.

८) व्याख्यानमाला आयोजित
करणे


ई) पालक / नागरिकांकरिता

१) शेतकरी मेळावा आयोजित
करणे

२)मजदूर पालकांचा मेळावा
श्रेणी शह: आयोजित करणे.

या व्यतिरिक्त अन्य आपल्या संस्कार केंद्राच्या आवश्यकतेनुसार दत्तोपंत जी ची जन्मशताब्दी वर्ष मोठ्या उत्साहाने साजरी करावी .ही करत असताना सध्याचा काळ हा Covid-19 चा असल्याकारणाने शक्यतो आभासी ऑनलाइन पद्धतीने वरील कार्यक्रम घेण्यात यावे.

**10 डिसेंबर 2020 दत्तोपंत ठेंगडी पर्यावरण संरक्षण कार्यशाळा इको ब्रिक्स माननीय श्री दत्ताभाऊ पक्की गेवराई यांचे व्याख्यान**



**स्व.दत्तोपंतजी ठेंगडी - एक निस्वार्थ, दिशादर्शक दिपस्तंभ...." -** श्री. प्रकाशजी पाठक


https://youtu.be/MvWObfZf2rY

भा. शि. प्र. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्रजी आलुरकर, उपाध्यक्ष श्री. राधेश्यामजी लोहिया, कार्यवाह. श्री. नितीनजी शेटे, सहकार्यवाह डॉ. श्री. हेमंत वैद्य, प्रा. श्री. चंद्रकांत मुळे यांच्या उपस्थितीत स्व.दत्तोपंतजी ठेंगडी जीवन कार्य या विषयावर श्री. प्रकाशजी पाठक (धुळे), सहसंचालक, विवेकानंद केंद्र महाराष्ट्र प्रांत यांचे Online व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

स्व. दत्तोपंतजी ठेंगडी यांनी वर्धा येथून सुरू केलेले संघाचे काम अखंड व अविरतपणे एक जीवनवृत घेवून आजन्म केले. राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या व श्री. गुरुजीच्यां संस्कारातून तयार झालेल्या स्व. दत्तोपंतजी यांनी केरळ, मध्य प्रदेश, आसाम, बंगाल या प्रांतात खूप मोठे कार्य उभे केले. भारतीय मजदूर संघ , भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंच अशा अखिल भारतीय संघटनांची स्थापना केली.

अत्यंत बुध्दिमान, प्रभावी वक्तृत्व , अनेक भाषांवर प्रभुत्व , मृदू स्वभाव, आणि सर्वांना जवळ करून घेणाऱ्या वाणीतून उत्तुंग असे सेवाभावी कार्य उभे केले . राज्यसभेच एक अभ्यासू खासदार म्हणूनही अत्यंत मोलाचे कार्य केले. परंतु राजकारणात रममाण न होता अखिल भारतीय पातळीवर प्रवास करून मजदूर व किसान यांच्या प्रश्नासांठी अविरत कार्य करून त्यांच्याशीच नाळ बांधली.

Dt.11-11-2020




Shri Siddheshwar Mahavidyalaya Majalgaon Dist. Beed-431131 (MH)

दि.२५/०६/२०२१ दत्तोपंत ठेंगडी जन्मशताब्दी वर्ष श्री निलेश गद्रे यांचे व्याख्यान २५जून२०२१

## संविधानातील समतेच्या ध्येयासाठीच समरसतेचा मार्ग

14 एप्रिल 1983 रोजी डॉ.आंबेडकर आणि डॉ हेडगेवार यांच्या जन्म दिनाचा योग साधत संविधानाला अपेक्षीत तीच समता साधण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने सामाजिक समरसता मंचाच्या माध्यमातून समरसतेचा मार्ग दिला.

स्वातंत्र्य, समता न्याय याला बंधुता हे सूत्र जोडून या चतुसूत्री मध्ये संविधान बांधले ,जशी कुटुंबात वर्तणूक तशीच समाजात समरसतेचा भाव जागृत ठेवण्यासाठी मानसिकता तयार करणारा समरसतेच्या विचारासाठी श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य सुरू झाले.

समानते साठी केवळ समान वस्तूंचे वाटप करणे नसते तर ज्याची जितकी गरज ती पूर्ण करणे असते. नखाला किंवा करंगळीला जखम झाली तर सर्व शरीराची असते तसे समाज जीवनाच्या वेदना लक्षात घेतल्या पाहिजे, हा समानतेचा व्यवहार म्हणजेच समता....

समानतेसाठी फ्रान्स ,अमेरिका ,रशियात मोठा संघर्ष प्राणांची आहुती दिलेली आहे पण डॉ. आंबेडकर यांच्या मुळे, सत्याग्रहाच्या मार्गाने या क्रांतीला योग्य दिशा मिळाली. चवदार तळे महाडच्या पाण्यासाठी संघर्षाची ठिणगी पडू न देता विधायक मार्गदर्शनामुळे समतेसाठी चा प्रयत्न झाला .काळाराम मंदिर प्रवेशाचा संघर्ष पाच वर्षे चालला, जो राम सर्वांच्या हृदयात बसलेला आहे त्या रामाच्या मंदिरातील प्रवेशाने ,सर्वांच्या हृदयात प्रवेश मिळावा यासाठीचे ते आंदोलन होते .हे डॉ आंबेडकरांचे विचार.

कुप्रथा बाजूला काढून रुतलेले चाक हलवण्यासाठी "धम्मचक्र परिवर्तन" ची घोषणा 1935 ला केली . 1956 ला ,परकीय मुस्लिम किंवा ख्रिश्चन धर्म न स्वीकारता, हिंदू समाजाचे फार मोठे नुकसान होणार नाही हे पहात परिवर्तनाची दिशा समाजाला आंबेडकरांनी दिलेली आहे.

जातिभेद निर्मुलनासाठी महात्मा गांधी ,आगरकर, सावरकरा सह अनेक समाजसुधारकांचे प्रयत्न होते पण "जात नाही ती जात" यासाठी ती "विसरणे' हा व्यवहार ठेवल्याने जास्त चांगले परिणाम येतील हे लक्षात घेऊन डॉ हेडगेवार यांनी संघात मंत्र दिला .या बाबत डॉ.आंबेडकरांनी देखील "जी समता अपेक्षित आहे, ती संघात पाहायला मिळते" असा गौरव संघ शिक्षा वर्गातील भेटीदरम्यान केला .

गाधीहत्येनंतर नेहरूनी संघावर बंदी आणली तेव्हा डॉ.आंबेडकर संघाच्या बाजूने होते .श्री गोळवलकर गुरुजी ने पत्र पाठवून. दिल्लीत प्रत्यक्ष भेट घेऊन आंबेडकरांचे आभार व्यक्त केलेले आहेत.

संघ विचार आणि कार्याचा अपप्रचार करण्याचे षड्यंत्र जोरदार सुरू असताना एक शब्दही टीकेचा आंबेडकरांनी केला नाही तर संघ विरोधी शक्तीचा समाचार बोलण्यातून, लिहिण्यातून प्रखरपणे वारंवार त्यांनी घेतलेला आहे.

राजकारणात मराठवाडा विद्यापीठ प्रश्न केला गेला होता, पण 1978, संघ समाजमन तयार करत होते ,अखिल भारतीय विद्यार्थी परिषद नामांतराचा सक्रिय पाठिंबा देत होते

डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी निमित्याने समाजातील सर्व दूर आणि सर्व घटकापर्यंत लाभ देण्यासाठी पावणे दोन लाख सेवाकार्य संघ प्रेरणेतून सुरू झालेली आहेत.

द्वितीय सरसंघचालक श्रीगुरुजींनी 1966, 67ला प्रयाग, उडपी येथे हिंदू संमेलने घेऊन शंकराचार्य, धर्माचार्य,साधू,संत एकत्र करत विश्व हिंदू परिषदेचे कार्य सुरू केले. "आम्ही हिंदू ,सर्व एका आईची लेकरे आहोत. उच्च-नीच कोणीही नाही, समान आहोत." हा भाव जागृत करून समरसतेच्या कामात गती देण्याचे काम केले, तर पूजनीय बाळासाहेब देवरस यांनी पुण्यातील वसंत व्याख्यानमालेत "अस्पृश्यता हा कलंक मुळासकट उखडून फेकला पाहिजे" हे सांगितले ,त्याच मार्गदर्शना नुसार समाजात समतेच्या मार्गावर चालण्यासाठी स्वयंसेवक काम करत आहेत. संघाचा आरक्षणाला पाठिंबा आहे, विरोध नाही. ही स्पष्ट भूमिका आहे .तर समान नागरी कायदा , संस्कृतभाषा, भगवा ध्वज, तात्पुरते 370कलम हा संघाचा आणि आंबेडकरांचा राष्ट्रीय विचार सारखाच आहे." आर्य "या विषया वर देखिल षड्यंत्र होत असताना तो गुणवाचक शब्द आहे जातीवाचक नाही. ते भारतीय आहेत. हे आंबेडकरांचे ठाममत होते .

आंबेडकर हयात असताना त्यांना विरोध करणारे आज आपण त्यांचे कसे अनुयायी आहोत हे दाखवत आहेत,त्याचे तत्वज्ञान आंबेडकरांच्या नावे लादण्याचे काम देखील होत आहे. डाॅ. आंबेडकर हे संघाअनुकूल, राष्ट्रीय विचाराला धरून होते. ते बाबासाहेबांचे तत्वज्ञान समजेल तेव्हा खरी शांती निर्माण होईल ,हे काम शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी पुढच्या पिढीला द्यावे .खरं ते ठासून सांगावे. तेव्हाच गौतम बुद्धांचे "भवंतु सर्व मंगलम' हे सार्थ ठरेल ,हा समरसतेचा वाटा उचलण्यासाठी सहभाग घ्यावा असे आवाहन ,महाराष्ट्र व गोवा राज्य समरसता संयोजक निलेशजी गद्रे यांनी ,"भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व समरसता" या विषयावर बोलताना केले.

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई च्या वतीने श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडी जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित ऑनलाइन व्याख्यान कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष श्री राधेश्यामजी लोहीया होते .यावेळी अध्यक्ष डॉ अलुरकर, कार्यवाह नितीनजी ,सहकार्यवाह डॉ.वैद्य प्रा. मुळेसर यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी, सभासद, शिक्षक ,कर्मचारी बंधू-भगिनी उपस्थित होते . डॉ.गजानन होंन्ना, डॉ सुनील पाटील ,विष्णू सोनवणे प्रदीप जोशी यांच्यासह अनेकांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सहयोग दिला.

प्रमोद- बीड (९४०३९०४६५१)
२५जून२०२१

Shri Siddheshwar Mahavidyalaya
Majalgaon Dist.Beed-431131(MH)




Shri Siddheshwar Mahavidyalaya, Majalgaon Dist. Beed-431131 (MH)

सा.न्या.नों.क्र.एफ. १४ बीड

|| ॐ ||

|| केल्यानें होत आहे रे | आधीं केलेचीं पाहिजे ||

# भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई

◆ केंद्र कार्यालय ◆

फोनः- ०२४४६-२४८१२२

E-Mail :-bsps2011@rediffmail.com

जा.क्र/भाशिप्रसं/२०२१-२२/५०

दि.०५/०८/२०२१

अध्यक्ष
डॉ. सु. गो. आलूरकर
देगलूर

उपाध्यक्ष
श्री.रा.छ.लोहिया
माजलगाव

कोषाध्यक्ष
श्री.वि.रा.डुबे
परळी

कार्यवाह
श्री. नि. वि. शेटे
लातूर

सहकार्यवाह
श्री. डॉ. हे. व. वैद्य
गेवराई

प्रा.श्री. चं. अ. मुळे
बीड

डॉ.सौ.क.गो.चौसाळकर
अंबाजोगाई

प्रति,

सर्व संस्कार केंद्र प्रमुख,

प्राथमिक/माध्यमिक/महाविद्यालय,

भा.शि.प्र संस्था, अंबाजोगाई.

विषय : 'विवेकग्राम' योजना माहिती संदर्भात.

उपरोक्त विषयी आपल्या संस्कार केंद्राअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विवेकग्राम योजने बाबतची खालील उल्लेखीत माहिती केंद्र कार्यालयास दि. ०८.०८.२०२१ रोजी पर्यंत पाठवावी.

१. विवेकग्राम योजने अंतर्गत आपल्या संस्कार केंद्राने दत्तक घेतलेले गावाचे नाव.

२. विवेकग्राम योजनेच्या कार्य प्रमुखांची यादी.

३. विवेकग्राम योजनेच्या पदाधिकारी समितीची यादी.

४. सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ कालावधीमध्ये या योजने अंतर्गत राबविण्यात आलेले उपक्रमांचा लेखी अहवाल.

कार्यवाह
भारतीय शिक्षण प्रसारक संस्था
अंबाजोगाई

एक प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी -

१. मा. अध्यक्ष, स्थानिक समन्वय समिती, संबंधित शाखा.

२. मा. कार्यवाह, स्थानिक समन्वय समिती, संबंधित शाखा.

३. मा. अध्यक्ष, प्राथमिक/माध्यमिक/महाविद्यालयीन समिती, संबंधित शाखा.

06/08

Shri. Siddheshwar Mahavidyalaya
Majalgaon Dist.Beed-431131(MH)

केल्यानें होत आहे रे । आधीं केलेंची पाहिजे ।।
भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई संचलित
# श्री सिध्देश्वर महाविद्यालय, माजलगाव
ता.माजलगाव जि.बीड ४३१ १३१ (महाराष्ट्र)
(कला, विज्ञान व वाणिज्य)
नॅक मुल्यांकन दर्जा 'बी'
डॉ.महेश प्र. देशमुख
(एम.ए. पीएच.डी.)
कार्यालय: (०२४४३) २३५४७५, २३५९०१ फॅक्स: २३५४७५
Website: www.siddheshwarcollege.com
E-mail: siddheshwar.college@gmail.com

SSMM/2021/94　　　　दि. 6/8/2021

प्रति,

मा.कार्यवाह,

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,

अंबाजोगाई.

विषय - विवेकग्राम योजना संदर्भातील माहिती दाखल करणे बाबत.

संदर्भ:- आपले पत्र क्रमांक जा.क्र/भाशिप्रस/२०२१-२२/५० दि.०५/०८/२०२१

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रानुसार सदर संस्कारकेंद्रातर्गत राबविण्यात येत असलेल्या विवेकग्राम योजने बाबतची, मुद्देनिहाय, उल्लेखनीय माहिती व अहवाल या पत्रान्वये आपणाकडे दाखल करीत आहे. स्वीकारून नोंद घ्यावी हि विनंती.

सोबत:- वरीलप्रमाणे

आपला विश्वासू

E0 भारत [illegible]
06/08/2021

Shri Siddheshwar Mahavidyalaya Majalgaon Dist. Beed-431131(MH)

प्राचार्य
श्री.सिध्देश्वर महाविद्यालय,
माजलगांव जि.बीड
06/08

# श्री.सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव

## विवेकग्राम योजना अहवाल - (२०१९-२० व २०२०-२०२१)

विवेकग्राम योजना अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० व २०२०-२०२१ या काळात श्री.सिद्धेश्वर महाविद्यालयाने दत्तक गाव मंजरथ येथे राबविण्यात आलेल्या उपक्रमाचा अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

१. **विवेकग्राम अंतर्गत दत्तक घेतलेले गाव :-** मंजरथ ता.माजलगाव

२. **विवेकग्राम योजनेच्या कार्यप्रमुखांची यादी :-**

प्रा.डॉ.गवते डी.के.

प्रा.दीक्षित .सी.एल.

प्रा.डॉ.होन्ना जी.बी.

प्रा.मुळ्ये वाय.आर.

प्रा.डॉ.कोदरकर सी.एस.

प्रा.बागल जे.एस.

प्रा.नेळगे एस.एस.

**३.पदाधिकारी समिती**

अध्यक्ष :- मा.श्री.अभयजी कोकड (अध्यक्ष- महविद्यालय विकास समिती)

सचिव :- प्राचार्य.डॉ.भालचंद्र कराड (श्री.सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव)

**४. सन २०१९-२० व २०२०-२१ कालावधी मध्ये राबविण्यात आलेले उपक्रमाचा लेखी अहवाल:-**

१. मंजरथ येथे सरपंच मा. श्री. राजेंद्र आनंदगावकर उपसरपंच मा.श्री.संतोष वाघमारे व ग्रामस्थ यांच्या समवेत बैठक घेण्यात आली. या वेळी प्राचार्य डॉ.भालचंद्र कराड, मा.श्री.अभयजी कोकड व सर्व कार्यप्रमुख उपस्थितीत होते. बैठकीमध्ये विवेकग्रामचे स्वरूप व करावयाचे कार्य या संदर्भात चर्चा करण्यात आली.

२. दिनांक २५ जुलै-२०१९ रोजी दहावी बारावी परीक्षेत यशस्वी विधार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी उपसरपंच मा. संतोष वाघमारे व ग्रामस्थ उपस्थित होते.

Shri.Siddheshwar Mahavidyal

३. दिनांक १५ ऑगस्ट-२०१९ रोजी मंजरथ गावातील शाळेसमोर वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी सरपंच मा.श्री. राजेंद्र आनंदगावकर व गावकरी उपस्थित होते.

४. दिनांक १७ व १९ एप्रिल २०२० रोजी कोरोना काळात चाळीस गरजू नागरिकांना किराणा कीट वाटप करण्यात आले या वेळी स्था. कार्यवाह मा. श्री.अमरनाथजी खुर्पे स्था. अध्यक्ष.मा.श्री.प्रकाश दुगड, महविद्यालय विकास समिती अध्यक्षमा.श्री. अभयजी कोकड , सरपंच मा.श्री.राजेंद्र आनंदगावकर, उपसरपंच मा.श्री.संतोष वाघमारे, मा. श्री.जगदीशजी साखरे, प्रा.डॉ.भालचंद्र कराड उपस्थित होते.

५. दिनांक.२५-एप्रिल २०२० रोजी कोरोना काळात गरजू विध्यार्थ्यांना अन्नधान्य वाटप करण्यात आले. या वेळी उपप्राचार्य प्रा.डॉ.गजानन होन्ना, उपप्राचार्य प्रा.युवराज मुळये उपस्थितीत होते.

६. दिनांक ०४-जून-२०२० रोजी मंजरथ येथील गावक-यांना पाण्याकरिता टाक्या देण्यात आल्या. स्था. कार्यवाह मा.श्री. अमरनाथजी खुर्पे, स्था. अध्यक्ष मा.श्री.प्रकाशजी दुगड यांच्या हस्ते मंजरथ येथील सरपंच मा.श्री.राजेंद्र आनंदगावकर यांच्याकडे टाक्या देण्यात आल्या. या वेळी गावातील गावकरी उपस्थितीत होते.

७. दिनांक - ११ ऑगस्ट २०२० रोजी कोरोना जागृती च्या संदर्भात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. व्याख्याते म्हणून प्रा.सुरेश नेळगे उपस्थितीत होते. यावेळी सरपंच ,उपसरपंच व गावकरी हजर होते.

८. दिनांक २१ जाने-२०२१ रोजी माजी विधार्थिनीच्या सहभागातून कोरोना नियम पाळून पारिवारिकपणे हळदी कुंकवाचा कार्यक्रम घेण्यात आला.

९. दिनांक १७- फेब्रु-२०२१ रोजी गोदावरी घाट स्वच्छता अभियान राबविण्यात आले.याचे उद्घाटन मा.श्री.जगदीशजी साखरे यांनी केले. या वेळी उपसरपंच मा. श्री संतोष वाघमारे व गावक-याचा सहभाग लक्षणीय होता.

Shri.Siddheshwar Mahavidyalaya Majalgaon Dist.Beed-431131(MH)

डॉ.ज्ञानेश्वर को. गवते
विवेकग्राम प्रमुख

डॉ.महेश प्र.देशमुख
प्राचार्य

श्री.सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव जि.बीड.

# विवेकग्राम अहवाल

(प्रथम सत्र 2021-22)

मा.प्राचार्य साहेब

श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव

आपल्या नियोजनानुसार विवेकग्राम मंजरथ येथे घेतलेल्या उपक्रमाचा अहवाल सादर करत आहे.

1) 2 अक्टोंबर गांधी जयंती निमित्ताने वृक्षारोपण केले यावेळी उपसरपंच मा.संतोष वाघमारे व ग्रामस्थ उपस्थित होते.

2) गुणवंत विध्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी गोदावरी विद्यालयाचे पांडुरंग डासाळकर व ग्रामस्थ उपस्थित होते

3) लॉकडाऊनमध्ये गरजू कुटुंबाना किराणा किट वाटप केले तसेच पाण्याच्या 02 टाक्या देण्यात आल्या.

यावेळी सरपंच आनंदगावकर राजेंद्र , श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष मा.प्रकाशजी दुगड कार्यवाह मा.अमरनाथजी खुर्पे ,अभयजी कोकड महाविद्यालय वि.स.अध्यक्ष उपस्थित होते.

4) कोरोनाबाबत जनजागरण

करण्यात आले प्रा. दीक्षित यांनी याबाबत गावकऱ्यांना मार्गदर्शन केले

धन्यवाद

विवेकग्राम

प्राचार्य

प्रा. गवते डी.के.

प्रा.होन्ना जी.बी.

प्रा. मुळये वाय.आर.

प्रा. दिक्षित [illegible] -

प्रा. [illegible] -

प्रा. [illegible] -

केल्याने होत आहें रे |आधी केलेंची पाहिजे ||

Bhartiya Shikshan Prasarak Sanstha Ambajogai's

# Shri Siddheshwar Mahavidyalaya, Majalgaon

Dist. Beed (MS)

## VIVEKGRAM MANJRATH PHOTO GALLERY





Mr. Amarnathji Khurpe, Abhayji Kokad Local executive while distributing kirana to the needy in vivek village Manjrath during Corona Period.

Shri.Siddheshwar Mahavidyalaya






Sarpanch Santosh Waghmare and Villagers for Godavari Ghat cleaning here at Vivek village Temple

Shri Siddheshwar Mahavidyalaya Majalgaon Dist.Beed-431131(M.H.)





**Mr. Anandgavkar Sarpanch of Manjrath ,Office bearer while Welcome Jagdishji Sakhare and Celebrating Constitution Day.**

Shri Siddheshwar Mahavidyalaya
Majalgaon Dist.Beed-431131(MH)



Chief Guest on the occasion of "Gandhi Jayanti Swachhata Saptah" Programe organize at Vivekgram Manjrath Ta. Majalgaon by vekgramsamittee on the topic "Vyasanmukti Kalachi Garaj"on date 03 cotomber 2022.

Shri Siddheshwar Mahavidyalaya Majalgaon Dist.Beed-431131(MH)